# अहमदाबादमध्ये एअर इंडियाचे विमान कोसळून १७० ठार


सायंदैनिक

गुड इव्हिनिंग City

goodeveningcity@gmail.com

१२ जून २०२५, गुरुवार | वर्ष १४ वे | अंक ६३ | पृष्ठे ६ | किंमत ३ रू.







## विमानात गुजरातचे माजी सीएम विजय रुपाणी यांच्यासह २४२ जण



**अहमदाबाद, १२ जून (वृत्तसंस्था) :** गुजरातमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. अहमदाबादमधील मेघानी नगर परिसरात एअर इंडियाचं विमान कोसळल्याचं वृत्त समोर आलं आहे. या विमानात अनेक प्रवासी असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ज्या ठिकाणी विमान कोसळलंय तिथून धुराचे लोट निघत असल्याचं दिसत आहे. या घटनेचा थरकाप उडवणारा व्हिडीओ व्हायरल झाला असून ही खूप मोठी दुर्घटना असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या दुर्घटनेत किती हानी झाली आहे हे अद्याप समजलेलं नाही.

हे विमान रहिवासी भागात कोसळल्यामुळे मोठी हानी झाली असण्याची शक्यता वर्तवली आहे. मात्र त्याबाबतची कोणतीही माहिती अद्याप समोर आलेली नाही. दरम्यान, एएनआय या वृत्तसंस्थेने म्हटलं आहे की या विमानात २४२ प्रवासी होते. विमान कोसळल्यानंतर मोठा स्फोट होऊन विमानाने पेट घेतला आहे. त्यामुळे ही आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या सात गाड्या व बंब घटनास्थळी दाखल झाले असून आग विझवण्याचं काम चालू आहे. बचावकार्यासाठी आपत्कालीन बचाव पथक देखील मेघानीनगरमध्ये दाखल झालं आहे. पाठोपाठ सीमा सुरक्षा दल व एनडीआरएफची पथकं देखील बचावकार्यासाठी रवाना झाली आहेत. एअर इंडियाने देखील या दुर्घटनेची पुष्टी केली आहे. मात्र, या अपघाताचं कारण स्पष्ट केलेलं नाही. रवासी विमानात २४२ प्रवासी आणि कर्मचारी होते. त्यापैकी १६९ भारतीय नागरिक, ५३ ब्रिटिश नागरिक, १ कॅनेडियन नागरिक आणि ७ पोर्तुगीज नागरिक आहेत.

माहितीनुसार, विमानाच्या ढिगाऱ्यातून आतापर्यंत १३३ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. मदत आणि बचाव कर्मचारी आग विझवण्याचे काम करत आहेत तसेच ढिगाऱ्यात जखमी आणि मृतांचा शोध घेत आहेत.

ज्या इमारतीवर एअर इंडियाचे विमान कोसळले ती इमारत इंटर्न डॉक्टरांसाठी वसतिगृह होती. मिळालेल्या माहितीनुसार, येथे ५० ते ६० इंटर्न डॉक्टर होते. सर्वांचा मृत्यू झाल्याची भीती आहे. निवासी डॉक्टर त्याच्या शेजारील ब्लॉकमध्ये राहत होते. विमानाचा वैमानिक सुमित सुब्बरवाल यांनी शेवटच्या क्षणी मेडेला कॉल केला होता. हा एक आंतरराष्ट्रीय आपत्कालीन कॉल आहे, जो विमान गंभीर संकटात असताना आणि आपत्कालीन मदतीची आवश्यकता असताना पायलट पाठवतो. अपघातात गंभीर जखमी झालेल्या आणि भाजलेल्या लोकांना अहमदाबादमधील वेगवेगळ्या रुग्णालयात आणण्यात आले. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या एका व्यक्तीचा मृतदेह फूटपाथवर जळालेल्या अवस्थेत आढळला. रुपाणी यांच्या निधनाची माहिती भाजपचे राज्यसभा खासदार परिमल नाथवानी यांनी दिली.







पत्रकारितेच्या क्षेत्रात गुड इव्हिनिंग सिटीने जपलेली प्रामाणिकता आणि निर्भीडता आपण जाणता... **सन 2012 मध्ये** स्थापनेपासून गुड इव्हिनिंग सिटीने वाचकांशी आपली नाळ घट्ट जोडलेली आहे. वाचकांसोबत असलेल्या या अतूट नात्याला आता **14 वर्षे पूर्ण झाले आहे.** यानिमित्ताने वर्धापन दिनाचे औचित्य साधून गुड इव्हिनिंग सिटीने नवीन शैक्षणिक धोरण(NEP) आणि सध्याची शैक्षणिक स्थिती यावर आधारित पुरवणी काढण्याचे निश्चीत केले आहे. या विषयाला अनुरुप लेख, माहिती अथवा जाहिरातीचे आम्ही स्वागत करू... धन्यवाद...!

टिप - यासंबंधी लेख तसेच जाहीरात पाठविण्याची अंतिम मुदत 20 जून 2025 राहील.

14TH

14 वा वर्धापन दिन

सायंदैनिक गुड इव्हिनिंग City CITY PLUS

जाहीरात दर

| आकार | दर |
|---|---|
| फ्रंट पेज | 45,000/- |
| बॅक पेज | 40,000/- |
| फुल पेज | 30,000/- |
| हाफ पेज | 15,000/- |
| क्वार्टर पेज | 8,000/- |



प्रकाशक
रणजीतसिंग राजपूत 9850377344

संपादक
ॲड. हरिदास उंबरकर 9763469184

मुख्य कार्यालय
गाळा क्र. 2 पत्रकार भवन,
बस स्टॅन्ड जवळ, बुलडाणा-443 001
ऑफीस : 8378981344
E-mail: goodeveningcity@gmail.com

# निरामय

गुड इव्हिनिंग City

## पावसाळ्यात पिण्याच्या पाण्याबद्दल राहा विशेष जागरूक....

पावसाळ्यात पिण्याच्या पाण्याबद्दल विशेष जागरूक राहावे. मोठ्या शहरातील पाणीपुरवठा जलशुद्धीकरण होऊनच येतो. मात्र अनेक छोटी शहरे आणि



छोट्या गावांमध्ये, वाड्या वस्त्यांमध्ये अजूनही पिण्याच्या पाण्यासाठी नदी, तळी, विहिरी वापरल्या जातात अशा ठिकाणी पिण्याच्या पाण्याबाबत विशेष काळजी घ्यावी लागते. पावसाळ्यात अनेकदा पाण्यात नदीचा गाळ, मैला, कचरा आणि अन्य प्रदूषित पदार्थ वाहून येत असतात. त्याच बरोबर अनेक प्रकारचे पचनसंस्थेचे विषाणू; त्याचप्रमाणे टायफॉइड, डिसेन्ट्री, कॉलरा अशा आजारांचे जीवाणू; अमीबा, जियार्डीया असे प्रोटोझोअल जीव, कित्येक घटक रसायने, विषारी पदार्थ, कचरा हे देखील पाण्यामध्ये एकत्रित झालेले असतात. असे दूषित पाणी प्यायल्याने उलट्या, जुलाब, रक्ती आव, आमांश, कॉलरा, टायफॉइड, पॅराटायफॉइड अशांसारखे जीवाणूजन्य आजार होऊ शकतात. काविळीचे हिपॅटायटिस ए आणि इ, लहान बालकांना जुलाबाची पीडा देणारा रोटाव्हायरस, बालकांना पंगू करून सोडणारा पोलिओमायलायटिस असे विषाणूजन्य आजारदेखील दूषित पाण्यातून पसरतात. यावर उपाय म्हणजे सुरक्षित आणि जीवजंतूविरहित शुद्ध पाणी पिणे. घरी पाण्यासाठी फिल्टर असेल तर काही प्रश्न नसतो, पण ग्रामीण भागात आणि फिल्टर्स न परवडणाऱ्या नागरिकांनी पाणी स्वच्छ तिपदरी फडक्याने गाळून घ्यावे. नंतर ते उकळून निववावे आणि पिण्यासाठी वापरावे. बाहेरील पाणी शक्यतो पिऊ नये. स्वतःची पाण्याची बाटली जवळ बाळगावी. प्रवासात किंवा गावामध्ये फिरताना स्वतःची पाण्याची बाटली वापरण्याऐवजी अनेकदा मिनरल वॉटर वापरण्याचा प्रघात आजकाल दिसून येतो. मात्र मिनरल वॉटर बनवणाऱ्या कंपनीच्या दर्जाची खात्री करून घ्यावी.




पावसात मनमुराद भिजावेसे वाटते. लहान मुलेही संधी मिळाली, की अंगावरील शाळेचा गणवेश, वह्या, पुस्तके अशा कशाचाच विचार न करता पावसात बागडून घेतात. सगळे कसे आनंदाचे असते; पण दुसरा दिवस विचित्र उगवतो. नाक सर्दीने भरलेले असते. डोके दुखत असते. पाठोपाठ घसाही बोलू लागतो, अंगात ताप भरतो आणि आई-बाबांची बोलणी खात मुले आम्हा डॉक्टरांच्या दवाखान्याची पायरी चढतात. मग आठवडाभराची विश्रांती, शाळा बुडणे, अशक्तपणा, कडू औषधे हे सारे साग्रसंगीत होते. हे अगदी संपूर्ण टाळता येणार नसले, तरी नियंत्रणामध्ये नक्कीच ठेवता येईल. त्यासाठी पावसाळ्यातील हिंडणे-फिरणे हे जरा पथ्य पाळून, विचारपूर्वक करायला हवे...

# सर आली धावून, रोग आली घेऊन...



## फंगल इन्फेक्शन

पावसाळ्यात अनेक लोक सतत पावसात भिजतात. पावसात भिजल्यावर अंगावरचे कपडे न बदलता ओले कपडे घालून दिवसभर



वावरत राहतात. यामुळे जांघा, काखा, स्त्रियांच्या स्तनांखालील जागा यात 'टिनीया क्रुरीस' हे फंगल इन्फेक्शन होण्याची शक्यता असते. पावसाळ्यात भिजणे झाले नाही तरी पाण्यातून जाताना पाय ओले राहतात. त्यामुळे पायांच्या बेचक्यांमध्ये चिखल्या होणे, नखांची फंगल इन्फेक्शन्स होण्याचे त्रास होऊ शकतात. असे त्रास झाल्यास जाहिरातीतली दाद- खाज-खुजली असली मलमे लावू नयेत तर तुमच्या डॉक्टरांना किंवा त्वचारोग तज्ज्ञांना दाखवून घ्यावे. शहरामधील पावसात प्रदूषणातील रासायनिक घटक विरघळलेले असतात. त्यामुळे डोळ्यांची आग होते. पण साध्या स्वच्छ पाण्याने डोळे दिवसातून तीन-चार वेळा धुतल्यास ती आग कमी होते. न झाल्यास नेत्रतज्ज्ञांना दाखवून घ्यावे.

## साचलेले पाणी

पावसाळ्यात रस्त्यावर अनेक ठिकाणी पाणी साचते, खड्डे पाण्याने भरलेले राहतात, गटारे तुंबल्याने सडके पाणी जमा झालेले असते. अशा पाण्यामध्ये डासांची पैदास होते. खूप दिवस साचलेल्या पाण्यात ॲनोफेलिस डासांची वाढ होते आणि मलेरियाचा आजार पसरतो. घरातील कुंड्या, फुलदाण्या, एअर कंडीशनर, फ्रीज यांच्यातील पाण्यात टेरेसवर ठेवलेले सामान, रिकाम्या टायर्समध्ये साचणाऱ्या पावसाच्या स्वच्छ पाण्यात एडीस इजिप्ती या डेंग्यू आणि चिकुनगुन्या हे आजार पसरवणाऱ्या डासांची पैदास होते. हे डास म्हणजे आजाराच्या विषाणूंचे कीटकवाहक (इन्सेक्ट व्हेक्टर) असतात. जॅपनीज एनकेफेलायटिस क्युलेक्स प्रजातीच्या डासांपासून पसरतो. याकरिता पावसाळ्यापूर्वीच नागरी प्रशासनाकडून खड्डे बुजवणे, नाल्यांची दुरुस्ती करणे, पाणी साचण्याच्या जागा साफसूफ करणे या गोष्टी अपेक्षित असतात. तरीही घरात डास होत असतील तर घराच्या खिडक्यांना डास येऊ शकणार नाहीत अशा जाळ्या बसवणे, मस्किटो रिपेलंट वापरणे, झोपताना मच्छरदाणीचा वापर करणे या गोष्टी ध्यानात घ्याव्या लागतात.

## घाण आणि माश्या

पावसाळ्यात सर्वत्र चिखल होतो, रस्त्यावर, घरात, सार्वजनिक ठिकाणी ओलसरपणा आणि चिकचिक होते. त्यातच साचलेला कचरा, ओला होऊन घाणीचे साम्राज्य पसरते. अशा घाणीच्या ठिकाणी माशा जमा होतात. तिथून त्या खाण्याच्या पदार्थांवर बसतात. त्यांच्या पंखांना जीवजंतू चिकटतात त्यांच्यायोगे हगवण, कॉलरा, टायफॉइड, उलट्या-जुलाब तसेच हिपॅटायटिस ए आणि इ प्रकारची कावीळ पसरू शकते. हे आजार तसे गंभीर होऊ शकतात. त्यामुळे अशा माश्या होऊ न देणे आणि हे आजार झाल्यास डॉक्टरांचा सल्ला घेऊन त्वरित उपचार करणे गरजेचे असते. माश्यांचा उपद्रव टाळण्यासाठी घराभोवतालची जागा स्वच्छ ठेवावी. घरातील खाद्यपदार्थ नीट झाकून ठेवावेत. जाळीपासून तयार केलेले माश्या मारण्यांचे साधन वापरून माश्या माराव्यात. डिंकासारखा चिकट पदार्थ लावून तयार केलेला कागद ठिकठिकाणी ठेवल्यास त्याला माश्या चिकटतात. नंतर या कागदाचा नाश करता येतो. सार्वजनिक संस्थांनीही शहरात स्वच्छता राखण्याची दक्षता घ्यावी. कीटकनाशके वापरून माश्यांच्या अंड्यांवर व डिंभांचा नाश करावा.

# पावसाळ्यातील आरोग्यदायी आहार

**पावसाळा सुरू झाला, की मुलांच्याच काय; पण मोठ्यांच्याही तब्येतीच्या तक्रारी सुरू होतात. आपला मुलांचे स्वास्थ्य कसे सांभाळायचे, हा प्रश्न बहुतेक घरांमध्ये पडू लागतो. स्वास्थ्य किंवा स्वस्थ आरोग्याचे तीन स्तंभ मानले जातात, स्वस्थ आहार, स्वस्थ विहार आणि स्वस्थ विचार. आपण स्वस्थ आहाराबद्दल बोलू...**

सर्वप्रथम चुकीच्या आहाराच्या सवयींमुळे होणाऱ्या आजारांचा विचार करू. अस्वच्छ पाणी, रस्त्यावरील दूषित अन्न यातून होणारा जंतूसंसर्ग पावसाळ्यात अक्षरशः थैमान घालतो. तो टाळण्यासाठी विशेषतः अति लहान, वर्ष-दीड वर्षांच्या बाळांना उकळलेले पाणी द्यावे. थोड्या मोठ्या मुलांसाठी आणि कुटुंबासाठी शक्यतो फिल्टरचे पाणी उपयुक्त. मुलांनाही स्वच्छ व खात्रीलायक ठिकाणीच पाणी पिण्याचा आग्रह धरावा. तीच गोष्ट रस्त्यावरच्या, अस्वच्छ ठिकाणच्या चमचमीत; पण पचायला जड पदार्थांबद्दल. एक छान नियम लक्षात ठेवता येईल, पावसाळ्यात उकडलेले, उकळलेले आणि भाजलेले अन्न खावे. कच्चे, तळलेले आणि आंबवलेले पदार्थ टाळावेत. अर्थात, घरचे वरण-भात, भाजी-पोळी नक्कीच सुरक्षित. वडापाव, सामोसे, गाडीवरील फळांचे रस टाळलेलेच बरे. पावसाळ्यात आपली पचनसंस्थाही नाजूक झालेली असते. म्हणूनच मिठाई, चीज, पनीर, मांसाहार शक्यतो टाळावा. कदाचित म्हणूनच पूर्वापार चालत आलेली चतुर्मासाची संकल्पना जन्माला आली असावी. डॉक्टर मुलांना नेहमी फळे व हिरव्या भाजा खायला सांगतात. पावसाळ्यात मात्र रसाची फळे (उदा. कलींगड) टाळावीत. हिरव्या पालेभाज्या पटकन खराब होतात. त्या स्वच्छ धुणेही अवघड असते. सफरचंद, चिक्कू, डाळींब मर्यादित प्रमाणात, स्वच्छतेची काळजी घेऊन खाणे उपयुक्त. पावसाळ्यात चौरस; पण सुरक्षित आहार, हे सूत्र हवे. पावसाळ्यात वैद्यकीय दृष्ट्या शरीरातील मोकळ्या जागांमध्ये पाणी साठण्याची भीती असते. म्हणूनच जड पदार्थ, विशेषतः मीठ जास्त असलेले पदार्थ, सॉफ्ट ड्रिंक, थंड पेये, चायनीज पदार्थ खाऊ नयेत. गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, ओट्स यांपासून भाजून बनविलेले पदार्थ पावसाळ्यात नक्की उपयोगाचे पडतात. त्यामुळेच पोळी, भाकरी, थालीपीठ, पराठे जास्त खावेत. नाचणी, शिंगाडा, हातसडीचा तांदूळ यांचाही आहारात वापर करता येईल. प्रतिकारशक्ती व पचनसंस्थेची ताकद वाढविणारे अन्नपदार्थ पावसाळ्यात उपयुक्त. गरम वरण-भातावर पिळलेले लिंबू किंवा मोरावळा हे क जीवनसत्व मिळवून देते. त्यामुळे प्रतिकार यंत्रणा मजबूत होते. परंपरागत आल्याचा चहा किंवा दुधात सुंठ-हळद घालून घेणे हेदेखील प्रतिकारशक्ती वाढविण्यात उपयुक्त ठरते. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे पावसाळ्यात मुले कमी खातात, खरेतर कमी खायलाही हवे, म्हणजे पोटावर अत्याचार होणार नाहीत.

# गुड इव्हिनिंग City

१२ जून २०२५, गुरुवार


## नमो शेतकरी महासन्मान निधी योजना

# ई-केवायसी व आधार सीडिंग बँक खात्यांशी संलग्न करा : कृषी विभाग



**बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २० वा हप्ता जुलै २०२५ मध्ये वितरीत केला जाणार आहे. परंतु जिल्ह्यातील ३ हजार ४९२ शेतकऱ्यांची ई-केवायसी आणि ४ हजार ५९९ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग(ब्ल्हढ एपरलश्रश) अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांना सन्मान निधीपासून वंचित राहू शकतो. तरी शेतकऱ्यांनी ई-केवायसी आणि आधार सीडिंग बँक खात्यांशी संलग्न करून घ्यावे, असे आवाहन कृषि विभागाकडून केले आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र शासनाकडून वार्षिक सहा हजार रुपये आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेमार्फत वार्षिक सहा हजार रुपये शेतकरी कुटुंबांना दिले जात आहेत. त्यासाठी ई- केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्यावश्यक असून बँक खात्याशी किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँकमध्ये खाते उघडून त्या खात्याला आधार संलग्न करण्याचे काम तत्काळ पूर्ण करून घ्यावे. यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि कार्यालय व तालुक्यातील कृषी सहाय्यक, गाव नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे बुलढाणा यांनी केले आहे.

# व्यवहारांवर कोणतेही शुल्क लागणार नाही

## ३००० रु. पेमेंटवर दुकानदारांकडून ९ रुपये बातम्या खोट्या

**बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** यापूर्वी, काही माध्यमांच्या वृत्तांतात असा दावा करण्यात आला होता की केंद्र सरकार दुकानदारांकडून म्हणजेच व्यापाऱ्यांकडून ३,००० रुपयांपेक्षा जास्त UPI व्यवहारांवर शुल्क आकारू शकते. यासाठी, ०.३% व्यापारी सवलत दर (MDR) पुन्हा लागू केला जाऊ शकतो. म्हणजेच, जर तुम्ही ३,००० रुपयांपेक्षा जास्त णझख पेमेंट केले तर दुकानदाराला बँकेला ९ रुपयांपर्यंत शुल्क भरावे लागेल.

एका माध्यमांच्या वृत्तात दावा करण्यात आला आहे की २ महिन्यांत नवीन नियम लागू केले जाऊ शकतात. बँका आणि पेमेंट सेवा प्रदात्यांच्या वाढत्या पायाभूत सुविधा आणि ऑपरेशनल खर्च लक्षात घेऊन नवीन नियम आणले जाऊ शकतात. अलीकडेच, पीएमओ, अर्थ मंत्रालय आणि इतर विभागांची बैठक झाली आहे. सर्व भागधारकांशी (बँका, फिनटेक कंपन्या, NPCI) चर्चा केल्यानंतरच धोरण लागू केले जाईल.

मे २०२५ मध्ये, युनिफाइड पेमेंट इंटरफेस द्वारे १८,६७ कोटी व्यवहार करण्यात आले. या कालावधीत एकूण २५.१४ लाख कोटी रुपयांची रक्कम हस्तांतरित करण्यात आली. एका महिन्यात व्यवहारांची संख्या ४% ने वाढली आहे. २०२२ पूर्वी, व्यापाऱ्यांना व्यवहार रकमेच्या १% पेक्षा कमी रक्कम MDR किंवा व्यापारी सवलत दर म्हणून बँकांना द्यावी लागत होती. तथापि, डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने आर्थिक वर्ष २०२२ च्या अर्थसंकल्पात हे शुल्क काढून टाकले. तेव्हापासून, UPI ही सर्वात जास्त वापरली जाणारी पेमेंट पद्धत बनली आहे आणि RuPay देखील खूप लोकप्रिय झाले आहे.

दरम्यान, उद्योग क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे की मोठे किरकोळ व्यापारी सरासरी ५०% पेक्षा जास्त पेमेंट कार्डद्वारे करतात. त्यामुळे लहान शुल्काचा णझख पेमेंटवर मोठा परिणाम होण्याची शक्यता कमी आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्याचा ठार



**खामगाव, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्याच ठार झाल्याची घटना चिखली रोडवरील गणेशपूर शिवारातील रस्त्यावर घडली.प्राप्त माहितीनुसार आज सकाळी पाहाटे ५ च्या सुमारास अज्ञात वाहनाच्या जोरदार धडकेत ३ वर्षाच्या बिबट्याचा जागीच मृत्यू झाला. हिवरखेड पोलीस गस्तीवर असतांना सदर बाब निदंशनस आले. पोलिसांनी वनविभागाला माहिती दिली असता वनपरीक्षेत्र अधिकारी चेतन राठोड आपल्या कार्मांच्याऱ्यासमवेत घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून वनविभागाने सदर बिबट्याच्या शवाला शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले.

# मशाल फेरीने झाला नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचा श्रीगणेशा



**चिखली, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोन मध्ये किन्होळा गावाची निवड झाली असून लोक सहभागीय पद्धतीने सूक्ष्म नियोजन करून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा आराखडा तसेच गाव हवामान आराखड्याचा मसुदा तयार करण्यासाठी ११ जून ते १५ जून या कालावधीमध्ये विशेष पाच दिवसांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. किनोळा येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेची सुरुवात अतिशय आगळ्यावेगळ्या पद्धतीने करण्यात आली.

त्यामध्ये पहिल्या दिवशी स्थानिक ग्राम कृषी विकास समितीची सभा घेण्यात आली. यामध्ये गाव बैठक व मशाल फेरीचे नियोजन करण्यात आले. नानाजी देशमुख योजनेबद्दल सविस्तर माहिती कृषी विभागाचे सहाय्यक कृषी अधिकारी सौ योजना रमेश भागीले यांनी दिली.

गावातील शेतकरी वर्ग ग्रामस्थ महिला बचत गट सदस्य ह्याचा सहकार्याने गाव बैठक संपन्न झाली. यामध्ये विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यानंतर पारंपारिक वाद्याच्या गजरात गावातील भजनी मंडळी बचत गट कार्यक्रमाकरिता उपस्थित झाले. प्रगतशील शेतकरी दत्तात्रय बाहेकर यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करून गावामध्ये मशाल फेरीचे आयोजन करण्यात आले. मशाल फेरीनंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संकष्टी चतुर्थीचे महत्व..!

**मंत्रः- वक्रतुंण्ड महाकाय सूर्यकोटी समप्रभ ।**
**निर्विघ्न कुरु मे देव सर्व कार्य सवदा**

हिंदू पंचांगानुसार संकष्टी चतुर्थी वर्षामधून १२ येतात, जर अधिक मास आल्यास तर त्या १३ येतात, त्याचप्रमाणे , मंगळवारी येणाऱ्या चतुर्थीला अंगारिका चतुर्थी म्हणतात अंगारिका चतुर्थी, आणि ही मंगल ग्रहाची संदर्भातील संबंधित आहे.

(ज्याला आपण मंगळ म्हणतो म्हणजे मंगळवार, मंगळवार हे नाव देण्यात आले) या दिवशी याचे गणेशाचे व्रत करून व प्रार्थना केल्यास आपल्या मनोकामना पूर्ण होतात, अशा विश्वास भक्तांचा आहे, संकष्टी चतुर्थी हे गणेश भक्तांसाठी एक अत्यंत महत्त्वाचे व्रत आहे तसेच या दिवशी उपास करणारे भक्त चंद्राला अर्घ्य, दाखवून उपास सोडतात या दिवशी चंद्रायला फार महत्त्व दिलेले आहे, या दिवशी श्री गणेशाची आराधना केल्याने, सुख समृद्धी आणि अडचणी दूर होतात असे मानले जाते. या व्रताने, बुद्धी, रिद्धी आणि सिद्धी प्राप्त होते तसेच सर्व अडचणी आणि संकट दूर होतात, अशी मान्यता आहे. वरदान:-या दिवशी भगवान शिवाने गणेशाला सर्व देवांमध्ये श्रेष्ठ असे म्हटले जाईल. याच्या पाठीमागे एक दंतकथा आहे, तर ती पाहवा? श्री गणेशाची निर्मिती कशी झाली? तर ती पाहवा.



भगवान शिवजीची पत्नी देवी, पार्वतीने केली होती, पार्वतीने तिच्या अंघोळीसाठी वापरलेल्या हळदीच्या पेस्टमधून गणेशाची निर्मिती केली, त्या आकृतीमध्ये प्राण फुंकले. मग आंघोळ करायला गेली तिने गणेशाला असे सांगितले की मी आंघोळ करीत असताना कुणालाही आत येऊ देऊ नको ती , आंघोळ करत असताना तिने त्याला तिच्या दारावर पहारा देण्यासाठी उभे केले. शिव परत आले, आणि श्री गणेश त्याला ओळखत नव्हते, म्हणून त्याने त्यांना आतमध्ये जाऊ दिले नाही. भगवान शिव संतापले आणि त्यांनी, आपल्या अनुयायी देवतांना या मुलाला काही ,श्रेष्ठ शिष्टाचार, शिकवण्यास सांगितले. श्री गणेश खूप शक्तिशाली होते कारण त्याला, शक्तीची स्वरूप (स्त्रीशक्ती) पार्वती यांनी निर्माण केले होतं, त्याने भगवान शिवजीच्या सर्व अनुयाचा पराभव केला . गणेशान घोषित केले की माझी आई, आंघोळ करत असताना कोणालाही आत प्रवेश दिला जाणार नाही. स्वर्गीय ऋषी नारद आणि सप्तर्षी (सात ज्ञानी ऋषी) यांना वाढत्या गोंधळाची जाणीव झाली, त्या सर्वांनी मुलाला शांतहो व समजावून सांगण्यासाठी बरेच प्रयत्न केले. परंतु काहीही, त्याच्यावर परिणाम झाला नाही. सगळ्या, देवाचा राजा, इंद्राने त्यांच्यावर संपूर्ण स्वर्गीय सैन्यासह मुलावर हल्ला केला, परंतु त्यांना संधी मिळाली नाही, जोपर्यंत हा मुद्दा पार्वती आणि शिव यांच्यासाठी अभिमानाचा विषय बनला होता.) देवांचा पराभव झाल्यानंतर, त्रिमूर्ती ब्रह्मा (नियंत्रक) विष्णू (संरक्षक) आणि शिव (संहारक) यांनी गणेशावर हल्ला केला. युद्धाच्यादरम्याना शिवाने आपल्या त्रिशूलाने मुलाचे डोके उडविले, ही गोष्ट पार्वतीला कळतात तिचा राग अनावर झाला, आपला मुलगा मरण पावलेला पाहून पार्वतीने तिचे खरे रूप, आदिशक्ती, ब्रह्मांडाला इंधन देणारी, आणि सर्व पदार्थांना टिकून ठेवणारी आदिशक्ती म्हणून प्रकट झाली. एक भयंकर रुद्र रूप धारण करून पार्वतीने विश्वाचा नाश करण्याची शपथ घेतली, ज्यामध्ये तिचा मुलगा मारल्या गेला. तिचे रुद्र रूप पाहून, सर्व देवांनी तिला साष्टांग नमस्कार केला. आणि भगवान शिवाने वचन दिले की तिचा मुलगा पुन्हा जिवंत होईल, ट्रिनिटीने डोक्यासाठी जगाची शिकार केली, इकडे भूतलावर एक माता हत्ती, तिच्या मेलेल्या बछड्यासाठी रडत होती, त्यांनी त्या बछड्याच्या आईची सांत्वन केली, आणि गणेशाच्या मस्तकाच्या जागी हत्तीच्या बछड्याचे डोके निश्चित केले, भगवान शिवाने असे घोषित केले की, ह्या दिवसापासून मुलालागणेशया नावाने ओळखले जाईल असे वरदान दिले की, (तो दिवस होता, चतुर्थीचा) तू सर्व दुष्ट दैत्य व राक्षस यांचा नाश करशील, जे भक्त तुझी पूजा अर्चना करतिल त्यांच्यावर तुझी कृपादृष्टी करून त्यांच्या मनोकामना व अडचणी दूर करशील, सर्व पूजेमध्ये, व सर्व देवांमध्ये सर्वात प्रथम तू पूजनीय राहशील. त्याचप्रमाणे, इतर देवांनी सुद्धा त्यास आपली शक्ती व अस्त्रे सर्व प्रधान केली. व आशीर्वाद दिला.

गुड इव्हिनिंग City

**संकलन**
**दिवाकर नायडू,** बुलढाणा
मो.नं.९१४६४०२३३०

